# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१८

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १५ मार्च, २०१८ / फाल्गुन २४, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५१**

---

## नंदुरबार नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी जागा देण्याबाबत

**(१) * ३८५१० श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी जिल्हा सत्र न्यायालयाच्या जुन्या इमारतीची जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे काय तसेच याबाबची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय. नंदुरबार नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी जिल्हा सत्र न्यायालयाच्या जुन्या इमारतीची जागा मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.

(२) जिल्हाधिकारी, नंदुरबार यांनी नंदुरबार नगरपरिषदेच्या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी जिल्हा सत्र न्यायालयाच्या जुन्या इमारतीची जागा मिळण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन ज्ञापन दिनांक १४/०७/२०१४ अन्वये नंदुरबार येथील सि.स.क्र. ५७३ क्षेत्र ५६६९ चौ.मी. जागेचा आगावु ताबा नंदुरबार नगरपरिषदेस देण्याबाबतचे आदेश पारित करण्यात आले होते. तथापि सदर प्रकरणी शहरातील एका नागरीकाने केलेल्या पुनर्रीक्षण अर्जाच्या अनुषंगाने शासन ज्ञापन दिनांक १४/०७/२०१४ रद्द करण्याबाबतचे अर्धन्यायिक आदेश मा.राज्यमंत्री (महसूल) यांनी दिनांक ०४/०८/२०१६ रोजी पारित केलेत. त्यानुषंगाने शासन ज्ञापन दिनांक १९/०९/२०१६ अन्वये उक्त जागा मंजुरीबाबतचे शासन ज्ञापन दिनांक १४/०७/२०१४ रद्द करण्यात आलेले आहे. सदर कार्यवाहीच्या विरोधात नंदुरबार नगरपरिषदेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.१०१२६/२०१६ दाखल केलेली असून त्यात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३१/०७/२०१७ रोजी दिलेल्या आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणी प्रधान सचिव (महसूल) यांनी योग्य तो निर्णय घेणेबाबत आदेशित केलेले आहे. सदर प्रकरणी याचिकाकर्त्याचे म्हणणे ऐकून घेण्यात आलेले असून प्रकरण निर्णयार्थ बंद करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण व पनवेल (जि.रायगड) तालुक्यात समुद्राच्या पाण्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२) * ३९१५० श्री.बाळाराम पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण व पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील केळवणे, पुनाडे, वशेणी गावांतील शेकडो एकर भात शेतीत समुद्राचे पाणी घुसू नये यासाठी खारभूमी विकास विभागाने बांधलेले बंधारे निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे खार बंधाऱ्यांना वारंवार भगदाडे पडून समुद्राचे पाणी शेतात घुसून गावातील शेकडो एकर भात शेतीचे नुकसान होऊन जमिनी नापिकी झाल्यामुळे हजारो शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाचे बंधारे बांधणाऱ्या ठेकेदार व सदर कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या खारभूमी विकास विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच, सदर ठिकाणी सागरी बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) नाही.

पनवेल तालुक्यातील कोणी केळवणे आणि उरण (जि.रायगड) तालुक्यातील पुनाडे, वशेणी या खाजगी खारभूमी योजनांची बांधकामे खारभूमी विकास विभागाने केलेली नाहीत. सदर योजना खाजगी आहेत व त्यांची स्थानिक शेतकऱ्यांकडून देखभाल व दुरुस्ती केली जाते.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

महसूल व कृषी विभागाने संयुक्त पंचनामे केलेले आहेत.

पनवेल तालुक्यातील कोणी केळवणे आणि उरण (जि.रायगड) तालुक्यातील पुनाडे, वशेणी या योजना बृहत आराखड्यात समाविष्ट नाहीत. या खाजगी खारभूमी योजना आहेत. सदर योजनांवर शासनामार्फत खर्च करण्यात येत नाही.

जलसंपदा विभागांतर्गत योजनांची बांधकामे सामुदायिक सामाजिक जबाबदारी (CSR) निधी अंतर्गत हाती घेणेबाबतच्या दिनांक १०/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार उरण तालुक्यातील ७ खाजगी खारभूमी योजनांच्या संपूर्ण नुतनीकरणाच्या कामासाठी सिडको/जे.एन.पी.टी./ ओ.एन.जी.सी. यांच्याकडून निधी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच खाजगी योजना ताब्यात घेणेबाबतचा प्रस्तावाबाबत नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यानुसार किनारा नियमन क्षेत्र विषयक (CRZ) मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी येथील रिलायन्स कंपनीच्या अवैध गौण खनिज उत्खननाबाबत

**(३) * ३८४६९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २७९२१ ला दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील रिलायन्स कंपनीच्या अवैध गौण खनिज उत्खननाबाबत एक महिन्यात चौकशी पूर्ण करण्यात येईल अशी माहिती जिल्हाधिकारी, परभणी यांना दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे कळवले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीन महिने उलटूनही चौकशी व कारवाईस विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रिलायन्स कंपनी व दोषी अधिकारी, कर्मचारी यांच्याविरूध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) परभणी येथील रिलायन्स कंपनीच्या अवैध गौण खनिज उत्खननाबाबत अंदाजित एक महिन्यात चौकशी पूर्ण होईल असे उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, परभणी यांना कळविले होते.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी चौकशी अहवाल दिनांक ३/३/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, परभणी यांचेकडे सादर केला असून जिल्हाधिकारी, परभणी यांचेस्तरावर पुढील कार्यवाही सुरु आहे. प्रस्तुत कामाची व्याप्ती मोठी असल्याने व कंपनीकडून केलेल्या कामाची पूर्ण माहिती प्राप्त होण्यास विलंब झाल्याने अंतिम अहवाल सादर करण्यास विलंब झालेला आहे.

-----------------

## राज्यातील बंद औद्योगिक प्रकल्पांच्या जमिनींचा वापर करण्याबाबत

**(४) * ३७७९८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, अॅड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.आनंद ठाकूर, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३० वर्षापूर्वी औद्योगिक प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली १२६४ हेक्टर जमीन ही खाजगी कंपन्यांकडे असून त्यावर कोणतेही प्रकल्प उभारण्यात आले नसल्याने सदर जमिनीचा योग्य तो वापर करुन घेण्याबाबत निश्चित असे धोरण ठरविण्यासाठी वित्त विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच सर्वाधिक परदेशी गुंतवणूक राज्यात झाली असल्याचा दावा राज्य शासन करीत असताना एसईझेड राज्यात अपयशी ठरले असून राज्यातील निम्म्याहून अधिक विशेष आर्थिक क्षेत्र केवळ कागदावरच असल्यामुळे शासकीय एसईझेडसह साडेतीन हजार हेक्टर जमिनीचे भवितव्य अंधारात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीच्या अहवालातील धोरणानुसार बंद औद्योगिक प्रकल्पांच्या जमिनींचा वापर गृहनिर्माण, व्यापार किंवा अन्य कारणांसाठी करण्याची मंजूरी देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागांवर परवडणारी घरे उभारणे व बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित केलेल्या जमिनीची विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा किंवा हस्तांतरण करणे तसेच जमिनीच्या विक्री/वापरात बदल करणे यासाठी संबंधित ठिकाणाचा झोन बदल होणे किंवा कंपनी डबघाईस येणे या व इतर कारणांमुळे विक्री व इतर कारणांसाठीचे प्रस्ताव शासनास प्राप्त होत असतात. त्यानुषंगाने घ्यावयाच्या निर्णयांमध्ये सुसूत्रता राहण्यासाठी यासंदर्भात भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील भाग-सात खाली औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री/वापर बदलाच्या अनुषंगाने सर्वकष धोरण निश्चित करण्यासाठी शासनास शिफारस करण्याबाबत अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय, दिनांक २६/१२/२०१६ व दिनांक ११/०१/२०१७ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.

उद्योग विभागाने विशेष आर्थिक क्षेत्रातील जे क्षेत्र प्रचलित नियमानुसार व विहित कार्यपध्दतीनंतर केंद्र शासनाच्या मंजूरीनंतर विना-अधिसूचित अशा क्षेत्राकरिता एकात्मिक औद्योगिक क्षेत्र धोरण जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्यातील एकूण १४९ विशेष आर्थिक क्षेत्रांच्या प्रकल्पांना केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून त्यापैकी ८१ विशेष आर्थिक क्षेत्राच्या विकासकांनी बाजारातील चढउतारामुळे ८१ विशेष आर्थिक क्षेत्रे ना-अधिसूचित केली आहेत/माघार घेतली आहे.

त्यामुळे उर्वरित ६८ अधिसूचित विशेष आर्थिक क्षेत्रांपैकी अधिसूचित मान्यता प्राप्त ५०, अंतिम/औपचारिक मान्यता प्राप्त ०७ व तत्वत: मान्यता प्राप्त ११ विशेष आर्थिक क्षेत्रे आहेत. त्यानुसार सुमारे ९६४५३.३६ कोटी रुपये गुंतवणूक आणि सुमारे २९,४९,३०७ इतका रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

(३) होय, हे खरे आहे.

भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील भाग-सात खाली कंपन्यांसाठी औद्योगिक प्रयोजनासाठी संपादित जमिनीच्या विक्री/वापर बदलाच्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या समितीने शासनास सादर केलेल्या शिफारशी अहवालाचा सर्वंकष विचार करुन शासन निर्णय, दिनांक ११/०१/२०१८ नुसार धोरण निश्चित करण्यात आलेले आहे.

(४) उक्त शासन निर्णय, दिनांक ११/०१/२०१८ मधील तरतुदीनुसार, परवडणाऱ्या घरांच्या उपलब्धततेकरीता (Affordable Housing) मूळ चटई क्षेत्र निर्देशाकांच्या (Base F.S.I.) २०% क्षेत्रफळाएवढे ३० चौ.मी. ते ६० चौ.मी. क्षेत्रफळाच्या परवडणाऱ्या सदनिकांचे (Affordable Housing tenements) बांधकाम करणे आणि मूळ चटई क्षेत्र निर्देशाकांच्या (Base F.S.I.) च्या २०% क्षेत्रफळाएवढे बांधकाम क्षेत्र आर्थिकदृष्ट्या कमकूवत गट (EWS) व अल्प उत्पन्न गट (LIG) यांच्यासाठी घरे बांधून म्हाडाने मंजूर केलेल्या लाभार्थींना वितरीत करणे बंधनकारक आहे.

तसेच दिनांक ०२/०१/२०१८ रोजीच्या मा.मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत Additional Incentive देऊन संबंधित कंपनीने अधिकाधिक रोजगार निर्मिती करावी यासाठी स्वतंत्र Ancilliary Policy उद्योग विभागाने तयार करावी असे निदेश दिले होते. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करणेबाबत उद्योग विभागास कळविण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील टोलनाक्यांवर पिवळा पट्टा यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत

**(५) * ३८६३६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोलनाक्यांवर पिवळ्या पट्ट्याबाहेर वाहन उभे असल्यास त्या वाहनधारकांकडून टोल घेता येणार नाही अशी घोषणा शासनामार्फत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील कोणत्याही टोल नाक्यांवर राज्य रस्ते विकास महामंडळाची यंत्रणा नसल्यामुळे वाहन नेमके कुठे उभे आहे हे पाहणे कठीण झाल्यामुळे सदर निर्णयाची अंमलबजावणी होत नाही, तसेच, टोलनाक्यांवरील संघटीत ताकदीला एकट्या वाहनधारकास सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने टोल नाक्यांवर पिवळ्या पट्टीबाहेर उभी असणाऱ्यांना वाहनांकडून टोल वसुली न करण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सदर ठिकाणी शासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशाप्रकारची घोषणा मा.मंत्री महोद्यांनी केली होती. तसेच पिवळा पट्टा व त्यानुषंगाने केंद्र शासनाचे प्रचलित नियम व निकष, करारनाम्यातील तरतुदी, कायदेशीर व तांत्रिक बाब तपासून पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पिवळा पट्टा व त्यानुषंगाने केंद्र शासनाचे प्रचलित नियम व निकष, करारनाम्यातील तरतुदी, कायदेशीर व तांत्रिक बाब तपासून पुढील कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(६) * ३९०१२ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६ मधील खरीप हंगामात पीक विमा न भरलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत व ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी असलेल्या ६४७ गावातील शेतकऱ्यांना मदत वाटपाबाबतची कार्यवाही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०१७ च्या खरीप हंगामात ९ हजार गावांमधील पिकांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले असून औरंगाबाद विभागात ३ हजार पेक्षा जास्त गावात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, जिल्ह्यातील गावांची पैसेवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या सुधारीत दुष्काळी मॅन्युअलनुसार पैसेवारीचे निकष केंद्र शासनाने कालबाह्य ठरविण्यात आले असल्याने या गावांमधील शेतकऱ्यांना शासनाची कोणतीही मदत मिळणार नसल्याने याबाबत दुष्काळी मॅन्युअलमधील निकषात सुधारणा करण्याबाबत केंद्र शासनाला विनंती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाचे दुष्काळी मॅन्युअलमधील निकषात सुधारणा करून सन २०१६-१७ मधील ५० पैसापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या शेतकऱ्यांना मदतीचे वाटत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच किती गावातील शेतकऱ्यांना मदतीचे वाटप करण्यात आले,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय. मदतीचे प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

(२) सन २०१७ च्या खरीप हंगामात राज्यात १४६७९ गावांची तसेच औरंगाबाद विभागातील ३५७७ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली असून औरंगाबाद विभागामध्ये बीड मधील ०, जालना मधील ३५, लातूर मधील १७१, उस्मानाबाद मधील ०, परभणी मधील ८४९ व नांदेड मधील ११६८ गावांची पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी आलेली आहे.

(३) होय.

(४) सन २०१६ च्या खरीप हंगामातील बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी आवश्यक निधीचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आले आहेत तसेच २०१७ च्या खरीप हंगामातील ५० पैशांपेक्षा कमी पैसेवारी आलेल्या १४६७९ गावांमध्ये शासन निर्णय दिनांक २८/२/२०१८ अन्वये विविध उपाययोजना जाहिर करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील पशुधन विमा योजना सुरु ठेवण्याबाबत

**(७) * ३८२०६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जानेवारी, २०१६ मध्ये सुरु करण्यात आलेली पशुधन विमा योजना वर्षभरातच संपुष्टात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून एक वर्ष राबविण्यात आली मात्र एक वर्षाचा करार संपल्यानंतर या योजनेकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष तसेच आर्थिक नियोजनाअभावी योजना बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या योजनेचे आर्थिक नियोजन न करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन सदर योजना सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) हे खरे नसुन, न्यु इंडिया इन्श्युरन्स कंपनीसमवेत सन २०१६-१७ मध्ये करण्यात आलेल्या कराराचा कालावधी दिनांक ३१/०३/२०१७ रोजी संपुष्टात आलेला आहे.

चालु आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत केंद्र हिश्श्याचा एकूण निधी रुपये २००.०० लक्ष राज्यास वितरीत केलेला असून, त्यापैकी रुपये १९७.८६ लक्ष व त्यास समरूप राज्य हिश्श्याचा निधी रुपये १३४.७७ लक्ष, असा एकूण रुपये ३३२.६३ लक्ष निधी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ या अंमलबजावणी यंत्रणेकडे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

योजनेचे आर्थिक नियोजन करण्यात आलेले असल्याने, अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतचा प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत विमा कंपनी निश्चित करण्याची कार्यवाही सुरू असून, विमा कंपनी निश्चित झाल्यानंतर सदर योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

-----------------

## सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय (जि.नांदेड) यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(८) * ३९१७४ श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे कार्यरत असलेले सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याविरुध्द स्थानिक नागरीक व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मत्स्यव्यवसाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नांदेड यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या प्रकरणी शासनस्तरावरुन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नांदेड यांच्याविरुध्द प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, नांदेड यांना कारणे दाखवा नोटीस बजावलेली असून या प्रकरणी सहआयुक्त (भूजल) व प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, लातूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेती महामंडळाच्या सहसंयुक्त शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत

**(९) * ३८४२५ श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेती महामंडळाच्या सहसंयुक्त शेतीधारकांना न्याय देण्याकरीता मा.महसूल मंत्र्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन न करता अधिकाऱ्यांनी जमिनीच्या निविदा प्रकाशित केल्याने शेतकरी अडचणीत आले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.महसूल मंत्र्यांनी व्यवस्थापकीय संचालकांना या प्रकरणी विचारणा केली असताना ऊस गाळपाला जाऊ द्या त्यांचे करार नियमित करु द्या अशा सूचनाही दिल्या परंतू मा.महसूल मंत्र्यांच्या लेखी आदेशाशिवाय ऊस गाळपाला जाऊ देणार नाही व करार नियमितही करून देणार नाही असे सांगून जमिनीची निविदा प्रक्रिया सुरु केल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने श्रीपूर मळयातील जमीन संयुक्त शेतीकरीता करारादृवारे अधिरथ ट्रेडींग प्रा.लि. या कंपनीस सन २०१५ मध्ये दिली होती.

अधिरथ ट्रेडींग कंपनीने करारानुसार महामंडळाच्या देय रक्कमा थकविल्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार त्यांच्यासोबतचा संयुक्त शेती करार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या दिनांक १६/०९/२०१६ रोजीच्या आदेशादृवारे संपूष्टात आणलेला आहे.

करारनाम्यातील अट क्र. १३(ब) नुसार संयुक्त शेतीकरीता करारादृवारे देण्यात आलेल्या क्षेत्रापैकी कोणतेही क्षेत्र अन्य व्यक्तीस अथवा संस्थेस लागवडीसाठी देता येत नाही. तथापि अधिरथ ट्रेडींग कंपनीने सदर कराराचे पालन न करता त्यांना संयुक्त शेतीकरीता कराराने दिलेल्या जमिनीपैकी काही जमिनी अनधिकृतपणे काही व्यक्तींना उपकराराने दिल्या होत्या. सदरचे उपकरार बेकायदेशीर असल्याने त्याबाबत वृत्तपत्रामध्ये जाहीर निवेदन शेती महामंडळादृवारे प्रसिध्द करण्यात आले होते. तसेच बेकायदेशीररित्या उपकराराने शेती घेऊ नये ही बाब सदर परिसरातील व्यक्ती/शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणली होती. त्यानंतरही सदर कंपनीकडून बेकायदेशीररित्या उपकराराने शेती घेतलेल्या काही शेतकऱ्यांनी महामंडळाच्या जमिनीवर पिके घेण्याचे सुरू ठेवले होते.

करारनाम्यातील अट क्र. ५(अ) नुसार संयुक्त शेती करार संपूष्टात आल्यामुळे सदर जमिनीवर उभ्या असलेल्या पिकांवर महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचा हक्क आहे. यासंदर्भात काही शेतकऱ्यांनी दिवाणी न्यायालयामध्ये दावे दाखल केले होते. दिवाणी न्यायालयाने सदरचे अर्ज नामंजूर केले असून महामंडळाच्या बाजुने निर्णय दिलेले आहेत. सदरचे निर्णय पाहता महामंडळाच्या जमिनीवर आणि त्यातील कोणत्याही पिकांवर सहसंयुक्त शेतीधारकांचा हक्क निर्माण होत नाही. अनधिकृतपणे शेती उपकराराने घेतलेल्या शेतकऱ्यांचे करार नियमित करण्याबाबत व ऊस गाळपाला जाऊ देण्याबाबतच्या सूचना महामंडळास शासनस्तरावरून देण्यात आलेल्या नाहीत.

महामंडळाचे आर्थिक नुकसान व अतिक्रमण टाळण्यासाठी संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार श्रीपूर मळ्यावरील जमीन संयुक्त शेती पध्दतीने देण्याकरीता नव्याने निविदा मागविण्यात आल्या असून एकूण क्षेत्राचे २५ ब्लॉक पाडण्यात आलेले आहेत व सर्व शेतकऱ्यांना निविदा प्रक्रियेत भाग घेण्याची मुभा आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देणेबाबत

**(१०) * ३८०२२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९९६ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात विशेषतः बीड जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नुकसानीबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केला असून दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यातील निधी मागणीचा एकत्रित प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावात पिकनिहाय नुकसान झालेले एकूण क्षेत्र, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या आदींचा समावेश केलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये उक्त प्रस्तावातील पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या, पिकनिहाय नुकसान झालेले क्षेत्र व नुकसानग्रस्तांना मिळणारी मदत यांचा तपशील काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) व (४) शासन निर्णय, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ अन्वये, राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या प्रस्तावात पात्र नुकसानधारक शेतकऱ्यांची संख्या १,७८,०१७, पिकनिहाय नुकसान झालेले क्षेत्र १००३२६.९ हे.आर. व नुकसानग्रस्तांना भरपाईसाठी आवश्यक निधी रुपये ६८,१५,४८,७२२/- चा समावेश केलेला आहे. सदर प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून निधी मागणीबाबतचा एकत्रित प्रस्ताव प्राप्त होताच माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही करण्याबाबतची बाब विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड धरणग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(११) * ३८७९४ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील भामा आसखेड धरणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनीच्या बदल्यात जमीन मिळावी, शेतकऱ्यांना धरणाचे पाणी मिळावे, पुनर्वसन गावठाणांमध्ये पायाभूत सुविधा द्याव्यात इ. मागण्या प्रकल्पग्रस्तांनी शासनाकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून भामा आसखेड धरणातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या संदर्भात प्रकल्पग्रस्तांच्या मागणीनुसार जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी दिनांक ०१/०२/२०१८ रोजी १४६ खातेदारांना व उर्वरित २४२ खातेदारांना दिनांक १६/०२/२०१८ रोजी कलम १६(२) अन्वये नोटीसा देण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे. सदर नोटीसानुसार प्रकल्पग्रस्तांकडून ६५ टक्के रक्कम भरुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

रौंधळवाडी ता.खेड अंतर्गत विरोबा वस्ती व चौरघे वस्ती येथील नागरी सुविधांसाठीचे रुपये २,१५,७३,०००/- व मौजे शिवे ता.खेड या गावच्या नागरी सुविधांसाठी रुपये २ कोटी इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची कार्यवाही विभागीय आयुक्त, पुणे यांचे स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जायकवाडी धरणग्रस्तांच्या भूखंडाचे नामांतर करून गैरव्यवहार केल्याबाबत

**(१२) * ३८५७१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील जायकवाडी धरणग्रस्तांच्या भूखंडाचे जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता भूमी अभिलेख कार्यालयाने तीन परस्पर नामांतर करण्यात येवून शासनाच्या लाखो रुपयांचा महसूल बुडविल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) मौजे पैठण येथील जमिनीवर जायकवाडी धरणग्रस्तांसाठी प्लॉट पाडून त्यांचा प्रत्यक्ष ताबा तहसिलदार, पैठण यांचेमार्फत धरणग्रस्तांना देण्यात आलेला आहे. सदरचे प्लॉट जिल्हाधिकारी यांचे पुर्व परवानगीशिवाय विकता येत नाहीत. अशा १३०० मिळकती असून मिळकत पत्रिका लिहीताना काही मिळकत पत्रिकांवर 'पुनर्वसन' अशी नोंद घेतलेली आहे तर काही मिळकत पत्रिकांवर तशी नोंद घेतलेली नाही. त्यामुळे काही धरणग्रस्तांनी जिल्हाधिकारी यांची पुर्व परवानगी न घेता जमीन विक्री केली असून असे १३ फेरफार झाले आहेत. सदर फेरफार रद्द करण्याची अनुमती उपअधिक्षक, पैठण यांनी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचेकडे मागितलेली होती. तथापि, प्रस्तावात त्रुटी असल्याने सदरचा प्रस्ताव जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी त्रुटी पुर्ततेसाठी परत पाठविला आहे. सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचे स्तरावर संकल्पित आहे. तसेच जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयानेही दिनांक ०१/०३/२०१८ रोजी जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना सदरच्या पुनर्वसित मिळकत पत्रिकांवर पुनर्वसनाची नोंद घेण्याबाबत कळविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यातील अतिदुर्गम गावामध्ये विविध योजना राबविण्याबाबत

**(१३) * ३८४२६ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्याच्या अतिदुर्गम महाराष्ट्र-तेलंगाना राज्य सीमा पहाडी भागातील १२ गावामध्ये राज्य शासनाप्रमाणे शेजारील तेलंगाना राज्य विकासाची कामे करीत असल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिदुर्गम जिवती तालुक्याच्या पहाडी भागातील १२ गावामध्ये तेलंगाना राज्य घरकुल, रेशनकार्ड, जात प्रमाणपत्र इत्यादी कामे करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त तालुक्याच्या पहाडी भागातील १२ गावामध्ये विशेष विकासासाठी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर विशेष विकास उपाययोजनेचा सर्वसाधारण तपशील काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी शासनास अलिकडे लेखी तक्रार केली असल्याचे दिसून येत नाही. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधी वेळोवेळी याबाबत तोंडी तक्रार करीत असतात, असे जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले आहे.

(२) होय.

(३) व (४) जिवती तालुक्यात महाराष्ट्र शासनातर्फे आरोग्य सेवा, रस्ते, विद्युत पुरवठा व इतर मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत, तसेच विविध योजना राबविण्यात येत आहेत. या तालुक्याचा मानव विकास निर्देशांक कमी असल्याने विविध योजनेचा आराखडा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पारसिक हिल (जि.ठाणे) येथील खाणमालकांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * ३८२६३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सिडकोच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या पारसिक हिल येथील भाडेतत्वावर देण्यात आलेल्या ९४ खाणमालकांनी सन १९८१-१९८३ या कालावधीत वितरीत क्षेत्रापेक्षा अधिक प्रमाणात खाणीचे खोदकाम केल्यामुळे पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात सिडकोच्या तोपोग्राफिक नकाशा अन्वये निर्धारित क्षेत्राच्या केवळ १५% ते २०% क्षेत्र उपलब्ध असताना District Environment Appraisal committee (DEAC) ने ७४ नव्या खाणींना ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) वन विभागाकडून सिडकोकडे हस्तांतरीत केलेल्या सुमारे १३८ हेक्टर क्षेत्रावर ९४ प्रकल्पग्रस्तांना खाणकामासाठी भाडेपट्टा देण्यात आला असून वन विभागाने हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्राचा खाणकाम व अनुषंगिक प्रयोजनासाठी वापर होत असल्याची बाब वन विभागाने जिल्हाधिकारी ठाणे यांच्या निदर्शनास आणली असून त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) जिल्हास्तरीय विशेषज्ञ मुल्यांकन समितीने (District Level Expert Appraisal Committee) सिडकोच्या जागेवरील ७५ दगडखाणींना पर्यावरण अनुमती देणेबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (District Environment Impact Assessment Authority) यांचेकडे शिफारस केली आहे. तथापि,

जिल्हास्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (District Environment Impact Assessment Authority) सदर दगडखाणींना अद्याप पर्यावरण अनुमती दिलेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मंत्रालयातील दालनासाठी अवाजवी खर्च केल्याबाबत**

**(१५) * ३९००८ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथील मंत्रालयातील प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या एका दालनाच्या नुतनीकरणासाठी रुपये ४५ लाख १८ हजार ६८४ चा अवाजवी खर्च करण्यात आला असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी ई-टेंडरिंग न करण्यासाठी रुपये ३ लाखापेक्षा कमी रकमा मंजूर करण्यासाठी एकूण १२ कार्यादेश काढण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाखो रुपयांचा अवाजवी खर्च करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मंत्रालयातील दालनाच्या नुतनीकरणाच्या माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये करण्यात आलेल्या कामांबाबत दिनांक १४ ऑगस्ट, २०१७ रोजी तक्रार प्राप्त झाली आहे.
(२), (३) व (४) सदर तक्रारीत नमूद मुद्यांच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई या राज्यस्तरीय दक्षता पथकास आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार याबाबत चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## औरंगाबाद विभागात केळी बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(१६) * ३८५४८ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात थंडीमुळे केळी उत्पादकांच्या केळी बागांचे नुकसान होत असून जास्त थंडीमुळे परिपक्व केळीत सालीखाली लालसर तांबूस रेषायुक्त डाग पडत असून या डागामुळे केळीचे भाव पडत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केळी बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

तथापि, औरंगाबाद जिल्ह्यामध्ये फेब्रुवारी, २०१७ अखेरच्या स्वयंचलित हवामान केंद्रावरील नोंदीनुसार कमी तापमानाचा हवामान धोका लागू झाल्यामुळे सिल्लोड तालुक्यात २ शेतकऱ्यांना तसेच सोयगांव तालुक्यात ८ शेतकऱ्यांना अशा एकूण १० विमाधारक शेतकऱ्यांना फळपीक विमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) उपविभागीय कार्यालय इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(१७) * ३९२५० श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विभागीय आयुक्त, नाशिक कार्यालयाच्या दिनांक १३ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये येवला (जि.नाशिक) उपविभागीय अधिकारी कार्यालय इमारत बांधकामाचे शासनास प्राप्त झालेले अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेअभावी शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येवला उपविभागीय कार्यालय इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून दिनांक १३/०३/२०१५ च्या पत्रान्वये येवला (जि.नाशिक) उपविभागीय अधिकारी कार्यालय इमारत बांधकामाचा प्रस्ताव या विभागास प्राप्त झाला आहे. सदर इमारतींचा नकाशा व अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आली होती. सार्वजनिक बांधकाम विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता करुन प्रस्ताव दिनांक २१/०२/२०१८ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास तांत्रिक मंजूरीसाठी सादर केला आहे. सदर मंजूरी प्राप्त झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## विदर्भ ऑटोरिक्षा चालक फेडरेशनच्या मागण्यांबाबत

**(१८) * ३९२५७ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ ऑटोरिक्षा चालक फेडरेशनद्वारा नागपूर अधिवेशन काळात विविध मागण्यांसंदर्भात मोर्चा काढण्यात आला असून त्यामध्ये ऑटोरिक्षा चालकांसाठी परिवहन मंत्रालयांतर्गत कल्याणकारी महामंडळ स्थापन करावे अशी मागणी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सर्वत्र चालणारी बेकायदेशीर प्रवासी वाहतूक बंद करण्यात यावी, ओला, उबेर या भांडवलदार कंपन्यांवर कारवाई करण्यात यावी, ऑटोरिक्षा चालकांसाठी घरकुल योजना सुरु करावी व इतर मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भ ऑटोरिक्षा चालक फेडरेशनच्या मागण्यांसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) विदर्भ ऑटोरिक्षा चालक फेडरेशनने दिनांक २६/११/२०१७ रोजी निवेदन केले आहे. सदर निवेदनात विविध विषयाशी संबधित मुद्दे उपस्थित केले असून त्यामधील या विभागाच्या अखत्यारितील मुद्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

अ) राज्यातील विविध रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाद्वारा कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेला अहवाल कामगार विभागाच्या कार्यवाहीखाली आहे.

ब) ओला, उबेर यासारख्या ॲप बेसवर चालणाऱ्या टॅक्सीसाठी दिनांक ०४/०३/२०१७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र टॅक्सी नियम-२०१७ लागू केले आहेत.

क) ऑटोरिक्षा चालकांसाठी घरकुल योजना सुरू करण्याची बाब या विभागाच्या कार्यवाहीखाली नाही.

ड) अवैध प्रवासी वाहतुकीविरुध्द परिवहन विभाग व वाहतूक पोलीस यांच्यामार्फत कारवाई करण्यात येते.

ई) ई-रिक्षा संदर्भात शासनाने दिनांक ०३/०८/२०१६ व दिनांक ०२/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित केले आहे.

सन २०१५ ते सन २०१८ या तीन वर्षाच्या कालावधीत ८,५५,७४० इतकी वाहने तपासण्यात आली असता १,३१,५६२ एवढी वाहने दोषी आढळून आलेली आहेत. त्यापैकी २०,२२६ वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आली असून १५,७५८ वाहन चालकांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. तसेच २९,२७२ वाहनांची नोंदणी निलंबित करण्यात आली असून रुपये ८०४१.५० लाख एवढा दंड व शुल्क वसूल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील रविनगर, नागभवन, आमदार निवास व शासकीय वसाहतीची देखभाल-दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) * ३९३१४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रविनगर, नागभवन, आमदार निवास व शासकीय वसाहतीमधील विकासकामांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नेहमी दुर्लक्ष होत असून वसाहतीमधील इमारतीची अनेक वर्षापासून दुरूस्ती, रंगरंगोटी, जुनी नेहमी बंद होत असलेली गटारे, फुटलेली पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन, जुनी खराब झालेल्या विद्‌युत तारा, रस्त्यांवर पडलेले खड्डे, वाढलेली झाडे-झुडपी, परिसरात पसरलेली घाण, तसेच साफसफाई कर्मचाऱ्यांची असलेली अपुरी संख्या यामुळे तेथील रहिवाश्यांना नेहमीच त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसाहतीमधील कामांकडे होत असलेल्या दुर्लक्षाबाबत तेथील रहिवाशांनी अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी अर्ज करून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसाहतीमधील कामांकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागील वर्षी निधीची तरतूद करण्यात आली परंतु अद्यापपर्यंत त्या निधीमधून कोणतेही काम करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसाहतीमधील विकास कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन वसाहतीची देखभाल, दुरुस्ती, निगराणी करण्याबाबत तसेच सर्व सोयी-सुविधा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

रविनगर वसाहतीमधील कामांकरीता तेथील रहिवाशांनी केलेल्या मागण्या ह्या उपलब्ध निधीनुसार प्राथम्यक्रमाने पूर्ण करण्यात येतात.

(३), (४) व (५) रविनगर वसाहतीमधील कामांकरीता मागील वर्षी निधीची स्वतंत्र तरतूद प्राप्त झाली नाही. तथापि, सदर परिसरातील निवासस्थानांच्या देखभाल व दुरूस्तीवर सन २०१६-१७ मध्ये रुपये १३०.०० लक्ष खर्च करण्यात आलेला आहे व सन २०१७-१८ मध्ये रुपये २७८.०० लक्ष किंमतीचे कामे मंजूर आहेत. शासकीय कार्यालयीन/निवासी इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीच्या लेखाशीर्षाखाली हिवाळी अधिवेशनात माहे डिसेंबर, २०१७ मध्ये एकत्रितपणे संपूर्ण राज्याकरीता मंजूर झालेल्या पुरवणी मागणीमधून नागपूर शहरातील रविनगर, नागभवन, आमदार निवास व शासकीय वसाहतीच्या देखभाल व दुरूस्तीच्या कामांकरीता निधी उपलब्ध करून देणे विचाराधीन आहे.

-----------------

## कळवा (जि.ठाणे) खाडीकिनारी शासकीय भूखंडावरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(२०) * ३९४०२ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि.ठाणे) खाडीकिनारी शासकीय कार्यालये आणि व्यावसायिक संकुलाकरिता आरक्षित असलेल्या ७२ एकर शासकीय भूखंडावर अतिक्रमण करून झोपड्या आणि बेकायदेशीर बांधकाम करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय भूखंडावर बेकायदेशीर बांधलेल्या झोपड्या व बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) असे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करण्याबाबत

**(२१) * ३९५१२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २७८२५ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठीच्या उपाययोजनेंतर्गत कार्यरत कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन तसेच बळीराजा चेतना अभियान या उपक्रमाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती वाढवून त्यात इतर जिल्ह्यांचा अंतर्भाव करण्यासंबंधी बाब तपासण्याविषयीची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत उपाययोजनांमध्ये नाशिक विभागाचा समावेश करणेसंबंधी कोणता निर्णय घेण्यात आला,

(३) असल्यास, नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यातच दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक १५ मे, २०१७ या कालावधीत २०६ शेतकऱ्यांनी विविध कारणास्तव केलेल्या आत्महत्येच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभियान/उपक्रमामध्ये नाशिक विभागाचा समावेश करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अद्यापि निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दोन हजार किलोमीटरचे रस्ते बांधण्याबाबत

**(२२) * ३९७१७ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या "भारतमाला" या योजनेंतर्गत राज्यातील रस्ते विकासाच्या योजनेचा आढावा घेण्यासाठी दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी मुंबईतील सहयाद्री अतिथीगृह येथे मा.मुख्यमंत्री, मा.केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री, मा.सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांच्या उपस्थितीतील सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बैठकीत एका वर्षात दोन हजार किलोमीटरचे रस्ते बांधण्याच्या कामास मान्यता देण्यात आलेली असून या बांधकामासाठीचे भूसंपादन माहे मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे ठरविण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयानुसार किती गावातील किती भूसंपादन करावे लागणार आहे व त्यामुळे किती कुटुंबे बाधित होणार आहेत, उक्त बाधित कुटुंबाना किती मोबदला देण्याचे ठरविण्यात आलेले आहे व त्यांचे पुनर्वसन कशाप्रकारे व कोठे करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) उपरोक्त बैठकीमध्ये "भारतमाला" योजनेंतर्गत १२०२ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचे ३३ विविध प्रकल्पांविषयी चर्चा झाली. त्यापैकी चांदणी चौक येथील उड्डाणपुलासह सुधारणेच्या २.२० कि.मी. प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेकडून सुमारे १४.०० हेक्टर भूसंपादन करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच सोलापूर शहरातील २ उड्डाणपुलांच्या ८.३० कि.मी. प्रकल्पासाठी सोलापूर महानगरपालिकेमार्फत/सुमारे २१.८३ हेक्टर भूसंपादन करण्याचे प्रस्तावित आहे. उर्वरीत ११९१.५० कि.मी. रस्त्यांच्या २९ प्रकल्पांसाठी ४५३ गावांमध्ये सुमारे ३४५९.१७ हेक्टर भूसंपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार करण्याचे प्रस्तावित असून भूसंपादनाचा मोबदला २०१३ च्या भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार देण्यात येणार असल्याचे प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) बसस्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(२३) * ३९९७८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६८० ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) बसस्थानक इमारतीची दुरवस्था झाली असून बसस्थानक परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य तसेच अत्यंत दुर्गंधी पसरली असून बसस्थानकातील शौचालयाचीही दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बसस्थानकाच्या दुरवस्थेमुळे प्रवाशांना त्रास होत असून मोडकळीस आलेल्या बसस्थानकाची इमारत कोसळून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बसस्थानकाची दुरुस्ती करुन बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) पाली येथील बसस्थानकाच्या इमारतीस सुमारे ३७ वर्षे झाली असल्याने इमारतीमध्ये सध्या आवश्यक ती किरकोळ दुरुस्ती करुन इमारतीचा धोकादायक भाग जसे आरसीसी सज्जे, पडदी इ. चे तोडकाम केलेले असून, दुर्घटना होणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे.

राज्य परिवहन महामंडळाद्वारे पाली येथे नवीन अद्ययावत सर्व सोयी सुविधांनी युक्त असे बसस्थानक बांधण्यासाठी वास्तुशास्त्रज्ञांची नेमणूक केलेली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस, बसस्थानके, कार्यालये, निवासस्थानांची सामाईक जागा, चालक/वाहक विश्रांतीगृह, अतिथीगृह, पाण्याच्या टाक्या इ. ची स्वच्छता प्रभावीपणे होण्यासाठी राज्य स्तरावर ब्रिक्स इंडिया लि. या संस्थेची अलीकडेच नेमणूक करण्यात आली असून, त्यांनी स्वच्छतेचे काम चालू केले आहे. तसेच, बसस्थानक परिसरात बाहेरुन येणाऱ्या सांडपाण्याचा योग्यप्रकारे निचरा करणेबाबत महामंडळाद्वारे नगरपंचायतीस कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत

**(२४) * ४००६५ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नापिकी, अवकळी पाऊस, दुष्काळ यासारख्या विविध नैसर्गिक आपत्तीमुळे राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांपैकी अनेकजण कुटुंबप्रमुख असल्याने त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांना संपूर्ण शिक्षण मोफत देऊन त्यांना शासन सेवेत कायम करणेबाबत विविध सामाजिक संघटनांकडून वारंवार मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांना संपूर्ण शिक्षण मोफत देऊन त्यांना सेवेत कायम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

शासन निर्णय क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र. १८९/म-७, दिनांक २३ जानेवारी, २००६ अन्वये नापिकी, कर्जबाजारीपणा व कर्जपरतफेडीचा तगादा या निकषात बसत असलेल्या प्रकरणांमध्ये जिल्हास्तरीय समितीकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास रुपये १ लक्ष मदत देण्यात येते.

(२) होय.

(३) सद्य:स्थितीत राज्यात इ.१० वी पर्यंत सर्वांना मोफत शिक्षण व इ. १२ वी पर्यंत मुलींना मोफत शिक्षण दिले जाते. तसेच टंचाईग्रस्त भागातील शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्यात येते. सदर योजनांचा लाभ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांनाही होत आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०२/१२/२०१७ अन्वये दुय्यम सेवा निवड

मंडळाच्या कक्षेतील गट-ब व गट-क पद भरतीच्या लेखी परीक्षेत जर उमेदवारांना समान गुण मिळाले असतील आणि अशा उमेदवारांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा पाल्य असेल तर त्यांना निवडीमध्ये प्रथम प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील काजू, आंबा बागायतदार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२५) * ४००९० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे डिंगणे, धनगरवाडी, मोरगांव, डेगवे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी लागलेल्या वणव्यात साडेतीनशे एकर क्षेत्रावरील काजू, आंबा बाग जळून बागायतदार शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मौजे डिंगणे येथे दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी अचानक आग लागून सुमारे १३९२.६४ हे.आर क्षेत्रावरील काजू बागायतीचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) शासन निर्णय दिनांक १३/०५/२०१५ नुसार शेतीपिके/फळपिके यांना आग लागून झालेल्या नुकसानीसाठी मदत अनुज्ञेय नसल्याने संबंधितांना मदत देण्यात आलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वारांगडे (जि.पालघर) येथील आदिवासीच्या जमिनीवर बेकायदेशीर कब्जा झाल्याबाबत

**(२६) * ४०१३२ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील तारापूर औद्योगिक परिसरातील वारांगडे येथील माधव सोहंग ह्या आदिवासीच्या सर्व्हे क्रमांक ६३ मध्ये असलेल्या जमिनींपैकी १११ गुंठे जमिनीवर विराज प्रोफाईल या कंपनीने कब्जा केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आदिवासीची कब्जा केलेली जमीन परत देऊन अवैधरित्या आदिवासीच्या जमिनीवर कब्जा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मौजे वारांगडे येथील गट क्र. ६३/१, क्षेत्र २-०३.८, पो.ख. ०-१८.० हे. आर ही जमीन श्री.माधव (महादू) झिणका सोहांग यांचा अर्धा हिस्सा व श्री.नवसू लाशा सोहांग यांचा अर्धा हिस्सा अशी सामायिकरित्या दाखल आहे. श्री.नवसू लाशा सोहांग व इतर ६ यांचे अर्धा हिश्श्याचे जमिनीवर बिगर आदिवासी इसम श्री.अब्दुल नईम चौधरी व इतर यांनी गोडावून व गाळ्यांचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बांधकामे परवानगी न घेता केल्याने तहसिलदार, पालघर यांनी आदिवासी खातेदार यांना महाराष्ट्र अनुसूचित जमातीना जमीन प्रत्यार्पित करणे अधिनियम १९७४ मधील तरतुदीनुसार जमीन प्रत्यार्पित करणेबाबत चौकशीची कार्यवाही सुरु केली आहे.

-----------------

## मौजे उकणी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील नुकसानग्रस्त सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२७) * ४०२५३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उकणी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्यांनी खरेदी विक्री संघाकडून खरेदी केलेले सोयाबीन बियाणे निकृष्ट प्रतीचे निघाल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे विक्री करणाऱ्या कंपनीवर कारवाई करुन नुकसानग्रस्त सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्हयातील वणी तालुक्यात खरीप हंगाम २०१७ मध्ये एकूण ७७.५० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिकाची पेरणी करण्यात आलेली होती. खरेदी विक्री संघ, वणी येथे महाबीज कंपनीच्या सोयाबीन बियाणाच्या २०० पिशव्या प्राप्त झालेल्या होत्या. सदर बियाणे निकृष्ट असल्याबाबत कोणत्याही शेतकऱ्याची लेखी तक्रार कृषी विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे, पालघर व रायगड जिल्हयातील रेती उत्पादकांना रेती रॉयल्टी देण्याचे बंद केल्याबाबत

**(२८) * ४०४२९ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, पालघर व रायगड जिल्हयातील खाडीपात्रातून डुबीने रेती उत्खनन करणाऱ्या रेती उत्पादकांना शासनाने दिनांक १/१०/२०१४ पासून रेती रॉयल्टी देण्याचे बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे डुबीने रेती उत्खन्न करणाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रेती उत्पादकांना रॉयल्टी देणे बंद करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पालघर व रायगड जिल्हयात खाडीपात्रातून हातपाटी वा डुबीने रेती उत्खननासाठी सन २०१५-१६ ते २०१७-१८ या कालावधीमध्ये परवाने देण्यात आलेले आहेत. मात्र ठाणे जिल्हयात खाडीपात्रातील जलमार्गातील नैसर्गिक पाण्याची खोली ३.० मीटरपेक्षा जास्त असल्याने तेथे हातपाटी वा डुबी या पध्दतीने रेती उत्खननाची महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सन २०१५ पासून शिफारस केली नसल्याने ठाणे जिल्हयात हातपाटी वा डुबीद्वारे रेती उत्खननासाठी सन २०१५-१६ पासून परवाने देण्यात आलेले नाहीत.

ठाणे, पालघर व रायगड जिल्हयातील डुबीने रेती काढणाऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## स्टॅंप अॅक्ट नुसार जमीन/फ्लॉटची प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या व्यवहारानुसार रेडी रेकनरचे दर ठरविणेबाबत

**(२९) * ४०४४२ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्टॅम्प अॅक्टनुसार प्रत्यक्ष नोंदणी झालेल्या व्यवहारानुसार रेडी रेकनरचे दर ठरविणे गरजेचे असतांना तसेच कोणत्याही प्रकारचे वैधानिक सर्वेक्षण न करता रेडी रेकनरचे दरवाढ केल्यामुळे अकोल्यातील बाजारमूल्य (रेडी रेकनर) चे सन २०१० पासून सन २०१६ पर्यंत अंदाजे तीन ते पाच पट वाढ करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजारात प्रत्यक्ष दर कमी झालेले असतांनाही शासनाच्या बाजार मुल्यानंतर स्टॅम्प ड्युटी भरावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रेडी रेकनरच्या वाढीव किंमतीमुळे केवळ स्टॅम्प ड्युटी वाढली नसून तर त्याचा परिणाम आयकर, व्हॅट, सर्विस टॅक्स, विकास शुल्कावर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निर्धारित करणे) नियम, १९९५ मधील तरतुदीनुसार खरेदी विक्री व्यवहारातील सरासरी दर, स्थानिक चौकशीतील दर इ. बाबी विचारात घेऊन वार्षिक मूल्यदर तक्ते निर्गमित केले जातात.

खरेदी विक्री व्यवहाराआधारे दर प्रस्तावित केले जात असल्याने मागील वर्षी प्रत्यक्ष बाजारात जेवढे दर वाढले असतात तेवढी सरासरी वाढ केली जाते. अकोला शहराबाबत सन २०१० ते २०१६-१७ पर्यंतच्या कालावधीत प्रत्यक्ष बाजारात झालेली वाढ वार्षिक मूल्य दर तक्त्यात प्रतिबिंबित झाली असून त्यानुसार जमीन दरात सर्वसाधारणत: २.५० ते ३.५ पट वाढ झाली आहे. तर सदनिका दरात ३ पट वाढ झाली आहे.

(२), (३), (४) व (५) वार्षिक मूल्यदर तक्त्यातील दरानुसार येणारे मूल्यांकन मान्य नसल्यास, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम ३१ नुसार, अभिनिर्णयात योग्य मूल्यनिश्चित करण्याची तरतूद असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परांडा (जि.उस्मानाबाद) येथील शेत रस्त्यावरील अतिक्रमण निष्कासित करण्याबाबत

**(३०) * ४०६९१ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परांडा (जि.उस्मानाबाद) येथील एक माजी सैनिकांनी त्यांच्या शेत रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी सनदशीर मार्गाने तहसिल कार्यालयात वेळोवेळी विनंती अर्ज करुनही कोणीच दाद देत नसल्यामुळे नैराशेच्या भावनेने तहसिल कार्यालयाच्या बाहेर स्वत:च्या जवळील पिस्तूलातून गोळीबार केल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माजी सैनिकांना परांडा तहसिल कार्यालयातून न्याय मिळत नसल्यामुळे त्यांनी अशा प्रकारे टोकाचा निर्णय घ्यावा लागला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) दिनांक २३/०१/२०१८ रोजी श्री.भैरु बब्रुवान कांबळे ही व्यक्ती “अतिक्रमित रस्ता आजच मला मोकळा करुन पाहिजे”, यासाठी परांडा तहसिल कार्यालयात आरडाओरडा करुन अरेरावीची भाषा करीत होती. यासाठी त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, परांडा येथे अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री.भैरु बब्रुवान कांबळे हे माजी सैनिक असल्याची नोंद जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, उस्मानाबाद

यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. सदर अर्जदाराने तहसिल कार्यालयात कशाचा आवाज काढला याचा तपास पोलीस स्टेशन परांडा यांचेकडून सुरु आहे. दरम्यान तहसिलदार, परांडा यांनी दिनांक ०७/०२/२०१८ रोजी 'गैरअर्जदार यांनी १ महिन्यात अतिक्रमण काढून रस्ता खुला करुन द्यावा व अर्जदार यांना सदर रस्त्याने वहिवाट करण्यास गैरअर्जदार यांनी कोणत्याही प्रकारचा अडथळा आणू नये', असे आदेश देवून अर्जदार यांचे प्रकरण निकाली काढले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील पोलीस वसाहतीच्या बांधकामाबाबत

**(३१) * ४०७४७ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात पोलीस वसाहती मधील घरांची दुरवस्था झाल्याने शाहूकालीन घरांसह ३० वर्षापूर्वी बांधलेल्या धोकादायक घरांमध्ये पोलीस कुटुंबीय भितीच्या छायेत राहत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे शहरासाठी १३४६ आणि इचलकरंजीसाठी २०० नवीन घरांचे बांधकाम करण्यास शासनाने दीड वर्षापूर्वी मंजूरी देऊन व ठेकेदार नियुक्त करुनही कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन येथील प्रस्तावित घरांच्या बांधकामाला सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

(२) सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित वरळी, मुंबई यांचेमार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जुन्नर ते बांबळेवाडी (ता.जुन्नर, जि.पुणे) या मार्गावर मिनी बससेवा सुरू करण्याबाबत

**(३२) * ४०८१० श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९५२ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर (जि.पुणे) तालुक्यातील मु.बांबळेवाडी (पो.तांबे) ते जुन्नर अशी बससेवा शासनाने मंजूर केलेली असतांना तांबे ते बांबळेवाडी हा रस्ता नवीन बनविण्यात आला असून, सदर मार्गावर बसफेऱ्या सुरू करण्यासाठी मार्ग वाहतुकीस योग्य असल्याबाबतची खातरजमा महामंडळाद्‌वारे करण्यात येवूनही अद्‌याप बांबळेवाडी ते जुन्नर बससेवा सुरू झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा रस्ता अरुंद असल्याने जुन्नर ते बांबळेवाडी अशी मिनी बस सेवा सुरू करावी अशी ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जुन्नर ते बांबळेवाडी या १५.९ कि.मी. अंतरापैकी तांबे ते बांबळेवाडी या २ कि.मी. रस्त्यापैकी १.४ कि.मी. रस्ता हा राज्य परिवहन वाहतुकीसाठी योग्य आहे. त्यापुढील रस्ता खराब व अरुंद गाडीवाट असल्याने सदर लांबीमध्ये रस्त्यासाठी आवश्यक असणारी जमीन ग्रामस्थांनी देणेबाबतची कार्यवाही तसेच, सदरच्या लांबीमध्ये रस्ता नव्याने मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जुन्नर ते बांबळेवाडी अशी मिनी बस सेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) जुन्नर ते बांबळेवाडी या १५.९ कि.मी. अंतरापैकी तांबे (११.९ कि.मी.) पर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या १६ फेऱ्या चालनात आहेत.

तांबे ते बांबळेवाडी या २ कि.मी. रस्त्यापैकी फक्त १.४ कि.मी. रस्ता हा राज्य परिवहन वाहतुकीसाठी योग्य आहे. त्यापुढील ०.६ कि.मी. रस्ता खराब व अरुंद गाडीवाट असल्याने एस.टी. वाहतूकीस योग्य नाही. सदरच्या लांबीमध्ये रस्ता नव्याने मातीकाम, खडीकरण व डांबरीकरण करावे लागणार आहे. यासाठी अंदाजे रुपये २०.०० लक्ष खर्च अपेक्षित आहे. तसेच, सदर लांबीमध्ये रस्त्यासाठी आवश्यक असणारी जमीन ग्रामस्थांनी देणे आवश्यक असल्याबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक १४/०७/२०१७ अन्वये राज्य परिवहन महामंडळास कळविले आहे.

जुन्नर ते बांबळेवाडी अशी मिनी बस सुरु करण्याबाबतचे निवेदन/मागणी प्राप्त झालेली नाही. सदर मार्गापैकी तांबे ते बांबळेवाडी असा पूर्ण मार्ग महामंडळाच्या कोणत्याही प्रकारच्या बस वाहतुकीस योग्य नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील द्राक्ष बागांवर रोगाचा प्रादुर्भाव होऊन द्राक्षपिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(३३) * ४०८८२ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज पूर्व भाग, पलूस, तासगांव व कवठेमहांकाळ (जि.सांगली) तालुक्यातील द्राक्ष बागांवर डाऊनी रोगाचा प्रादुर्भाव होऊन द्राक्षपिकांचे नुकसान झाले असल्याचे दिनांक ०३/०१/२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जिल्ह्यातील बेदाणे शेड रिकामे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने द्राक्षबागांचे पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील पीरवाडी समुद्र किनाऱ्यावरील धूप प्रतिबंधक बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३४) * ३९१४८ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील समुद्र किनारी बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे निकृष्ट दर्जाचे असल्याने पीरवाडी समुद्र किनारा समुद्राच्या लाटांमुळे खचला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समुद्र किनाऱ्याची दुरवस्था झाल्याने किनाऱ्यावर साठलेल्या दगड-मातीमुळे पर्यटकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उरण तालुक्यातील धूप प्रतिबंधक बंधाऱ्यांची देखभाल, दुरूस्ती करण्याबाबत तसेच निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या ठेकेदार व त्यांना पाठीशी घालणाऱ्यांना अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) पीरवाडी ते नागाव या भागातील समुद्र किनाऱ्यापैकी नागाव जवळील किनाऱ्याची समुद्राच्या लाटांमुळे काही प्रमाणात धूप होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पीरवाडी समुद्र किनारी कोणतेही समुद्र धुपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम करण्यात आलेले नाही. तथापि, पीरवाडी किनाऱ्यावर ONGC मार्फत बांधण्यात आलेला दगडी बंधारा काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) ONGC ही केंद्र शासनाची अंगीकृत संस्था असल्याने संबंधित संस्थेस कार्यवाहीसाठी किनारी अभियंता यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर फौजदारी खटला दाखल करण्याबाबत

**(३५) * ३९६०३ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील कल्याण तहसिल कार्यालयातील चार कर्मचाऱ्यांवर फौजदारी खटला दाखल करण्यासाठी सी.आर.पी.सी. कलम १९७ अन्वये अनुमती मिळावी म्हणून श्री.गणेश बाबुसिंग राठोड रा.वरप, ता.कल्याण यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे दिनांक १३/०८/२०१५ व दिनांक २४/०८/२०१६ रोजी सविस्तर निवेदन पाठवून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेरिटवर चौकशी करून प्रकरण निकालात काढण्याचे मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १८/१०/२०११ रोजी आदेश दिल्यानंतर सुध्दा तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी संबंधित आरोपी कर्मचाऱ्यांविरोधात सी.आर.पी.सी. कलम १९७ ची परवानगी दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३१ जुलै, २०१२ रोजीच्या पत्रान्वये श्री.गणेश बाबुसिंग राठोड यांना फौजदारी खटला दाखल करण्यासाठी सी.आर.पी.सी. क्र. १९७ नुसार परवानगी मिळण्याची विनंती अमान्य केल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) श्री.गणेश बाबुसिंग राठोड यांनी दिनांक १३/०८/२०१५ व दिनांक २४/०८/२०१६ रोजी अशाप्रकारची निवेदने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर केली आहेत.

(२) व (३) यापुर्वी श्री.राठोड यांनी दिनांक १८/११/२००८ रोजीच्या निवेदनाद्वारे संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द सी.आर.पी.सी. च्या कलम १९७ अन्वये फौजदारी खटला दाखल करण्यास परवानगी देण्याची विनंती केली होती. सदर विनंतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक १७/०२/२००९ रोजीच्या पत्रान्वये श्री.राठोड यांचा अर्ज निकाली काढला होता. उक्त निर्णयाविरुध्द श्री.राठोड यांनी कल्याण प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात दावा दाखल केला होता. मात्र सदर न्यायालयाने दिनांक १६/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये सी.आर.पी.सी. च्या कलम १९७ खालील परवानगी अभावी सदर दावा फेटाळला. उक्त कल्याण न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द श्री.राठोड यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी उक्त याचिकेत दिनांक १८/१०/२०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांनी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्यामार्फत स्वतंत्र चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द सी.आर.पी.सी. च्या कलम १९७ व भा.दं.वि. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यास सकृतदर्शनी तथ्य आढळून न आल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे पत्रान्वये संबधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द सी.आर.पी.सी. कलम १९७ अन्वये परवानगी नाकारण्याचा निर्णय घेतला आहे. तद्नुषंगाने उक्त प्रकरणी श्री.राठोड यांनी दाखल केलेली अवमान याचिका मा.उच्च न्यायालयाने निकाली काढली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

----------------

## आरमोरी (जि.गडचिरोली) तालुक्यात अवैध मुरुम उत्खनन रोखण्याबाबत

**(३६) * ३९७९८ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) येथील कोकडी बिटातील साग रोपवनातून गेल्या अनेक महिन्यापासून अवैधरीतीने मुरुमाचे उत्खनन केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अवैध मुरुम उत्खननामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अवैध मुरुम उत्खनन करणाऱ्यांविरुध्द तसेच त्यास सहकार्य करणाऱ्या वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) आरमोरी तालुका गडचिरोली जिल्ह्यात समाविष्ट आहे. आरमोरी परिक्षेत्रांतर्गत मौजे कुकडी गावालगत साग रोपवन नाही.

मौजे कुकडी, ता.आरमोरी येथील सर्व्हे नं.३८ या खाजगी जमिनीमध्ये तहसिलदार आरमोरी यांनी ०.३० हे.आर. क्षेत्रामध्ये मुरूमाचे खोदकाम करण्यास परवानगी दिलेली आहे.

सदर भागात कोणत्याही प्रकारचे अवैध मुरुम उत्खनन झाल्याचे जानेवारी, २०१८ मध्ये किंवा त्यासुमारास निदर्शनास आले नाही. त्यामुळे शासनाचा महसूल बुडण्याचा प्रश्न निर्माण होत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## ओझेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(३७) * ४०३५० श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओझेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील संत दामाजी सहकारी साखर कारखाना ह्या रस्त्याची दुरवस्था झाली असून उक्त रस्त्यावर खड्डे पडल्याने रस्ता वाहतुकीस धोकादायक झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्यांचे दुरुस्ती करुन रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ता हा गोपाळपूर-ओझेवाडी-उचेठाण-बठाण-ब्रम्हपूरी रस्ता प्रजिमा ७० चा भाग आहे. या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. या रस्त्याच्या १२ कि.मी. लांबीमधील मजबूतीकरण डांबरीकरणाचे काम निविदास्तरावर आहे. निविदा निश्चितीकरून काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील जमिनींची नियमबाहय विक्री केल्याबाबत

**(३८) * ४०१८० श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३५३७५ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी सन २०११ मध्ये पदाचा दुरुपयोग करून १०४ प्रकरणात नियमबाह्यरितीने वर्ग २ च्या सुमारे ५०० एकर जमीन ज्याची किंमत रुपये २००० कोटीहून अधिक आहे, अशा जमिनी बेकायदेशीररीतीने विक्री करण्यास परवानगी दिल्याप्रकरणी झालेल्या चौकशीचा अहवाल दिनांक २० जून, २०११ रोजी शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांची अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी विधानपरिषदेत तारांकित प्रश्नाच्या चर्चे दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील दोषी अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांनी बीड जिल्हा पुरवठा विभागात अनेक बेकायदेशीर कृत्य व गैरव्यवहार केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.महसूल मंत्री यांच्याकडे लेखी तक्रार करून सदर अधिकाऱ्यास अकार्यकारी पदावर नियुक्त करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) जमीन विक्रीबाबत १०४ प्रकरणात नियमबाह्य परवानगी दिल्याबाबत तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी श्री.एन.आर.शेळके यांना दिनांक २० जून, २०११ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले होते.

(२) विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक ३५३७५ च्या चर्चेदरम्यान अशी मागणी करण्यात आली होती.

(३) अशा स्वरुपाचे दिनांक १६/०१/२०१८ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) औरंगाबाद येथील शासकीय जमीन विक्रीस नियमबाह्य परवानगी दिल्याबाबतच्या विभागीय चौकशीअंती सिद्ध झालेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने तत्का.निवासी उपजिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना शिक्षा देण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहे. तसेच लोकप्रतिनिधी यांच्या दिनांक १६/०१/२०१८ रोजीच्या वर उल्लेखित पत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माहूर (जि.नांदेड) तालुक्यात तुषार संच व ठिबक सिंचन योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३९) * ४०४४५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर (जि.नांदेड) तालुक्यात सन २०११ ते २०१७ या कालावधीत तुषार संच व ठिबक सिंचन योजनेमध्ये बोगस लाभार्थ्यांची नावे टाकून करोडो रुपयांचा गैरव्यवहार करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी श्री.सचिन निलकंठराव टनमने यांची सदर आशयाची तक्रार विभागात प्राप्त झाली आहे.
(२) सदर तक्रारीमध्ये उपस्थित केलेले प्रमुख मुद्दे व त्याबाबतची वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे. :-

| अ.क्र. | तक्रारीतील प्रमुख मुद्दे | वस्तुस्थिती |
|---|---|---|
| I | सन २०१२-१३ मध्ये ०.८० हे. क्षेत्राकरिता सूक्ष्म सिंचन अनुदानाचा लाभ घेतलेला असताना कृषी विभागाच्या दस्तऐवजामध्ये माझे संपूर्ण क्षेत्रावर अनुदान घेतल्याचे दर्शविले आहे. | तक्रारदाराने २०१२-१३ मध्ये २ हे. क्षेत्रावर सूक्ष्म सिंचनासाठी अर्ज केलेला होता व मोका तपासणीमध्ये प्रत्यक्षात १.९५ हे. क्षेत्रावर सूक्ष्म सिंचन संच बसविल्याचे दिसून आले. सबब, १.९५ हे. क्षेत्रासाठी त्यांना अनुदानाचा लाभ देण्यात आला आहे. |
| II | अर्जदाराच्या मयत आईच्या नावे सन २०११-१२ मध्ये सूक्ष्म सिंचन अनुदानाची रक्कम रुपये ३९,५४० ची शिवम इरिगेशन, वाईबाजार, तालुका माहूर जि.नांदेड या वितरकाने परस्पर उचल केली. | तत्कालीन कार्यपद्धतीनुसार अर्जदाराने (आई) दिलेल्या विकल्पानुसार अनुदानाच्या रकमेचा धनादेश उत्पादक कंपनीच्या नावे देण्यात आला आहे. अर्जदाराच्या आईच्या नावे असलेल्या प्रक्षेत्रावर सूक्ष्म सिंचन संच बसविला असल्याची खात्री करण्यात आली होती. |
| III | माहूर तालुक्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांच्या नावाने बनावट प्रस्ताव तयार करुन अनुदानाची रक्कम उचलून महाघोटाळा करण्यात आला आहे. | तक्रारीच्या मुद्यांच्या अनुषंगाने संचालक (फलोत्पादन) यांनी विभागीय कृषी सह संचालक, लातूर यांचेकडून अहवाल मागविला आहे. सदर अहवाल अप्राप्त आहे. सदर अहवालामध्ये तक्रारदाराच्या 'मयत आईच्या नावे' अनुदान देण्यात आले आहे का? याची देखील शहानिशा करण्यात येत आहे. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सायगाव व पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथे नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत बांधण्याबाबत

**(४०) * ३९३०८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायगाव व पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथील जुने पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींची दुरवस्था झाल्यामुळे सदर बांधकामे निर्लेखित करून नवीन इमारती बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १० मे, २०१७ व दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर दोन्ही दवाखान्याच्या इमारती मोडकळीस आलेल्या असून, सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यात उक्त दोन्ही इमारतीच्या बांधकामाचा समावेश करण्यात आलेला आहे. या संदर्भात जिल्हा परिषदेकडून निधी उपलब्ध करुन, सदर इमारतींचे बांधकाम लवकरात लवकर करण्यात येईल.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नागपूर येथील अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(४१) * ३९३१८ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूरच्या विद्युत विभागाचे अधिक्षक अभियंता, आर.आर.आकुलवार व वरीष्ठ लिपिक, राजेंद्र भोसले यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून आपल्यापेक्षा खालच्या स्तरावरील अधिकारी व

कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देणे, शिवीगाळ करणे, जाणीवपुर्वक हितचिंतकाच्या बदल्या आपल्या कार्यालयात करणे, ज्यांच्याशी वाद असेल अशा व्यक्तींची हेतुपुरस्पर बदली बाहेरगावी करणे अशाप्रकारे आपल्या पदाचा गैरवापर सदर अधिकारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आकुलवार ह्यांनी आपल्या सेवा कार्यकाळात विद्युत विभागाच्या काढलेल्या कामांच्या निविदेच्या फाईलमध्ये कोट्यवधी रूपयाचा गैरव्यवहार केल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आपल्या पदाचा गैरवापर करणाऱ्या उक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामांची उच्च स्तरीय विभागाकडून चौकशी करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) याबाबतची सखोल चौकशी करण्यास अधिक्षक अभियंता, पुणे प्रादेशिक विद्युत विभाग, पुणे यांना निर्देश देण्यात आलेले आहेत. चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## नाशिक जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(४२) * ३९५१५ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३५१०४ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे शेती व फळ पिकांचे सुमारे २५,८०९.२५ हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करून पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून शेती व फळपिकांच्या नुकसानीचे संपूर्ण पंचनामे पूर्ण होवून अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचे वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन पत्रान्वये ऑक्टोबर, २०१७ मध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन, पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासनपत्राच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक, औरंगाबाद व अमरावती यांच्याकडून शेती व फळपिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून उर्वरित विभागांकडून अहवाल प्राप्त होताच माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये झालेल्या परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे ते पोलादपूर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) * ४०६२९ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते पोलादपूर भोर मार्गे-वरंध घाट-महाड-पोलादपूर या रस्त्याची दुरवस्था झाल्याने त्यांची दुरुस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.आदिवासी विकास मंत्री यांना दिनांक १० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांच्या कामांना मंजूरी देऊन दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) पुणे ते पोलादपूर भोर मार्गे वरंध घाट रस्त्याच्या दुरुस्तीकरीता मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम निविदास्तरावर असून काम लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

आदिवासी विकास विभागाकडे भोगाव-आदिवासीवाडी व तळयाची वाडी ते गोविले आदिवासीवाडी रस्त्यांबाबत निवेदन प्राप्त आहे. सदर दोन्ही कामे मंजुरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार आदिवासी विकास विभागामार्फत हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## श्रीपूर (जि.सोलापूर) येथील शेती महामंडळाच्या शेतातील अतिक्रमित पिके हटविण्यात आल्याबाबत

**(४४) * ४०७०७ प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीपूर (जि.सोलापूर) येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या साडेसात हजार एकर जमिनीपैकी साडेतीन हजार एकर जमीन आदिरथ कंपनीला कसण्यासाठी भाडेपट्ट्यावर दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीने कराराचे पालन न केल्यामुळे महामंडळाने भाडेपट्टा रद्द केला होता, त्यादरम्यान आदिनाथ कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांना काही जमिनी भाडेपट्ट्याने कसण्यास दिल्या होत्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांनी कष्टाने त्या जमिनींवर डाळींब, ऊसासारखी नगदी पिके जोपासल्यानंतर महामंडळाने त्या पिकांवर आपला अधिकार दाखवून पिके हटविणेची कार्यवाही केली त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने श्रीपूर मळयातील एकूण ३७३९ एकर २५ गुंठे जमीन संयुक्त शेतीकरीता कराराव्दारे अधिरथ ट्रेडींग प्रा. लि. या कंपनीस सन २०१५ मध्ये दिली होती.

अधिरथ ट्रेडींग कंपनीने करारानुसार महामंडळाच्या देय रक्कमा थकविल्यामुळे करारनाम्यातील अटीनुसार त्यांच्यासोबतचा संयुक्त शेती करार महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या दिनांक १६/०९/२०१६ रोजीच्या आदेशाव्दारे संपूष्टात आणलेला आहे.

करारनाम्यातील अट क्र. १३(ब) नुसार संयुक्त शेतीकरीता कराराव्दारे देण्यात आलेल्या क्षेत्रापैकी कोणतेही क्षेत्र अन्य व्यक्तीस अथवा संस्थेस लागवडीसाठी देता येत नाही. तथापि अधिरथ ट्रेडींग कंपनीने सदर कराराचे पालन न करता त्यांना संयुक्त शेतीकरीता कराराने दिलेल्या जमिनीपैकी काही जमिनी अनधिकृतपणे काही व्यक्तींना उपकराराने दिल्या होत्या. सदरचे उपकरार बेकायदेशीर असल्याने त्याबाबत वृत्तपत्रामध्ये जाहीर निवेदन महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाव्दारे प्रसिध्द करण्यात आले होते. तसेच बेकायदेशीररित्या उपकराराने शेती घेऊ नये ही बाब सदर परिसरातील व्यक्ती/शेतकऱ्यांच्या निदर्शनास आणली होती. त्यानंतरही सदर कंपनीकडून बेकायदेशीररित्या उपकराराने शेती घेतलेल्या काही शेतकऱ्यांनी महामंडळाच्या जमिनीवर पिके घेण्याचे सुरू ठेवले होते.

करारनाम्यातील अट क्र. ५(अ) नुसार संयुक्त शेती करार संपूष्टात आल्यामुळे सदर जमिनीवर उभ्या असलेल्या पिकांवर महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचा हक्क आहे. यासंदर्भात काही शेतकऱ्यांनी दिवाणी न्यायालयामध्ये व मा.उच्च न्यायालयामध्ये दावे दाखल केले होते. मा.न्यायालयाने सदरचे दावे फेटाळले असल्याने कोणत्याही प्रकारचा अन्याय झालेला नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधात्मक बंधाऱ्याची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(४५) * ४०८१३ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ३३३०६ ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण नगरपालिका हद्दीतील मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील धूप प्रतिबंधात्मक बंधाऱ्याचे काम अपूर्णावस्थेत असून त्या बंधाऱ्यालगतच्या किनाऱ्याची धूप होत असून सदर ठिकाणी उर्वरित भागाकरिता धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वारंवार निवेदन देऊनही शासनाने कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे. मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत ३०० मी. लांबीच्या धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. सदरील बंधाऱ्यालगतच्या किनाऱ्याची धूप होत असल्याचे निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी उर्वरित भागाकरिता ४५० मी. लांबीमध्ये धूपप्रतिबंधक बंधारा बांधणे आवश्यक आहे.
(२) हे खरे नाही, मेढा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथे धुपप्रतिबंधक बधारा बांधणेची मागणी स्थानिक ग्रामस्थानी केल्यानंतर सदर ठिकाणाची पाहणी करुन ४५० मी. लांबीचे रुपये ६०१.४६ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.
(३) सदर काम निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या प्राधान्यानुसार अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) तालुक्यातील अवैध माती उत्खनन रोखण्याबाबत

**(४६) * ४०८५० श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात मागील काही वर्षांपासून माती उत्खनन व जंगल तोड होत असल्यामुळे निसर्गसंपन्न परिसर नष्ट होत असून सदर उत्खनन हे महसूल विभागाच्या संगनमताने होत असल्याची तक्रार तेथील नागरीकांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध माती उत्खननामुळे शासनाचा करोडो रूपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) जिल्हाधिकारी, रायगड यांच्या कार्यालयात अशा आशयाची तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) महाड (जि.रायगड) तालुक्यात माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत "माती" या गौणखनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक/ साठ्याच्या १८ प्रकरणात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४८(७)(८) अन्वये सुमारे रुपये १.४० कोटी दंड आकारण्याची कारवाई करण्यात आली आहे.

महाड वनक्षेत्रामध्ये विहित कार्यप्रणालीद्वारे झाडे तोडण्याची परवानगी वन विभागामार्फत देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वागदरी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) येथील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४७) * ४०३५३ श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वागदरी (ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) बाजार पेठेतून जाणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर धुळीचे साम्राज्य पसरले असल्यामुळे येथील परिसरातील नागरिकांचे व व्यापाऱ्यांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करुन या रस्त्यांच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नांकित रस्ता आलूर-भुरीकवठे-वागदरी-शिरवळ-अक्कलकोट-जेवूर-करजगी मंगरुळ-तडवळ-मुंढेवाडी ते रा.मा.१३ रा.मा.२११ चा भाग आहे. या रस्त्याच्या वागदरी गावातील बाजारपेठतून जाणाऱ्या ६०० मी. लांबीत बसस्थानक व दुकाने आहेत. या लांबीत रस्त्याच्या डांबरी पृष्ठाभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. या भागात रस्त्यालगतच्या काही दुकानदारांनी टाकलेल्या मुरुम भरावामुळे काही प्रमाणात धूळ उडते. संबंधित व्यापाऱ्यांना त्याबाबत नोटीस देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील तलाठ्यावर कारवाई करण्याबाबत

**(४८) * ४०६७१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील तलाठी यांनी एका शेतकऱ्यांचे फेरफार करण्यासाठी दिनांक १७/१/२०१८ रोजी वा त्यासुमारस रुपये ३ हजार ५०० लाच घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी तलाठ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

तक्रारदार श्री.बालाजी नागनाथ वाघमारे, रा.कारेगांव, ता.देगलूर, जि.नांदेड यांच्या वडिलांच्या नावावरील मौजे कारेगांव येथील गट नं. ६४ मधील खरेदी केलेल्या ५१ आर शेतजमिनीचा तक्रारदार यांच्या नावाने फेरफार करुन सातबारा उतारा देण्यासाठी, श्री.गणेश राचन्ना परणे, तलाठी

कावळगांव, ता.देगलूर, जि.नांदेड यांनी रुपये ४,२५०/- इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रुपये ४,०००/- लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वीकारली. यास्तव, लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) अनुसार श्री.गणेश राचन्ना परणे, तलाठी कावळगांव, ता.देगलूर, जि.नांदेड यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन, देगलूर येथे गु.र.नं. २९/२०१८ दाखल करण्यात आल्याचे व श्री.परणे यांना अटक करण्यात आल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांनी दिनांक २४/०१/२०१८ रोजी कळविले होते.

त्यास अनुसरुन, उपविभागीय अधिकारी, देगलूर, जि.नांदेड यांच्या दिनांक ३१/०१/२०१८ च्या आदेशान्वये श्री.गणेश राचन्ना परणे, तलाठी कावळगांव, ता.देवलूर, जि.नांदेड यांना दिनांक २४/०१/२०१८ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्हयातील रेल्वे उड्डाणपुल व पोहोच मार्गाच्या कामांबाबत

**(४९) * ३९३११ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील प्रकाशा-लासलगाव-विंचूर-भरवसफाटा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७ या रस्त्यावरील रेल्वे उड्डाणपुल व पोहोच मार्गाच्या कामाला सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांच्या भूसंपादनाबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) प्रस्तुत प्रकल्पाच्या किंमतीत रेल्वेमार्फत बांधण्यात येत असलेल्या पुलाची किंमत वाढत असल्याने व भूसंपादनासाठी जादा खर्च होणे अपेक्षित असल्याने प्रकल्पाच्या कामाचे रुपये ५३००.२० लक्ष किंमतीचे सुधारित अंदाजपक तयार करण्यात आले आहे. या सुधारित अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करावयाची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## चासकमान (जि.पुणे) प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी मिळणेबाबत

**(५०) * ४०६४७ श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) याचिका क्र.७३१/२०१५ नुसार अनिल दामू खाडे व इतर सहा चासकमान प्रकल्पग्रस्तांना (जि.पुणे) पर्यायी जमिनी मिळणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांना दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रकल्पग्रस्तांचे संपादन क्षेत्र व कुटुंबसंख्येच्या प्रमाणात देय असलेले १ हेक्टर २० आर एवढे क्षेत्र पर्यायी जमीन म्हणून यापुर्वी प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे. याचिका क्रमांक ७३१२/२०१५ मधील मा.न्यायालयाचे आदेश व प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांचेस्तरावर सुनावणीबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे लिगाडेवाडी (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(५१) * ४०७१२ प्रा.डॉ.तानाजी सावंत :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लिगाडेवाडी (ता.सांगोला, जि.सोलापूर) येथील डाळिंबाच्या बागेवर किटकनाशक फवारणी करताना विषबाधा होऊन शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन केंद्रीय किटकनाशके मंडळाने प्रमाणित न केलेली अनधिकृत किटकनाशके विकणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करुन पिडीत कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.